२) सभेच्या वेळी गावातील पिक व्यवस्थापना विषयीच्या समस्यां बाबत चर्चा करावी. शेतीशाळेच्या रचनेद्दल कार्यप्रणाली बाबत माहिती द्यावी.

३) शेतकऱ्यांना कापुस पिकातील सुधारित वाण, ग्राम बिजोत्पादन कार्यक्रम याबाबत माहिती द्यावी.

## ■ तिसरा आठवडा

१) शेतकऱ्यांची निवड करावी.

२) त्यांची बॅलेट बॉक्स टेस्ट घेण्यात यावी. बॅलेट बॉक्स टेस्ट खालील प्रमाणे घ्यावी. निवडण्यात आलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या क्रमांकाच्या दहा चिठ्ठया देण्यात याव्यात.

**खालील किटक आपला मित्र/शत्रु आहे.**

**किटकाचे चित्र**

१) मित्र किटक
२) शत्रु किटक
३) ओळखत नाही




आकृतीत दाखविल्याप्रमाणे कार्डशीट पेपरवर शत्रुकिडी किंवा मित्र किटक यांचे चित्र लावावे व त्याखाली पर्यायी उपप्रश्न द्यावेत व त्यातून एकाची निवड करून खालील उताराच्या पाकीटात देण्यात आलेल्या चिठ्ठीतील एक चिठ्ठी टाकण्यास सांगावे.

**वरीलप्रमाणे तयार केलेल्या १० बॅलेट मध्ये निवडलेले शेतकरी दहा चिठ्ठया टाकतील त्यानंतर त्यांचे खालील प्रमाणे विश्लेषण करावे**

| अ. क्र. | शेतकऱ्याचे नाव | बॅलेट क्र.१ | बॅलेट क्र.२ | बॅलेट क्र.३ | बॅलेट क्र.४ | बॅलेट क्र.५ | बॅलेट क्र.६ | बॅलेट क्र.७ | बॅलेट क्र.८ | बॅलेट क्र.९ | बॅलेट क्र.१० | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ ते ३० | | | | | | | | | | | | |

## ■ चौथा आठवडा ते २० वा आठवडा .....

खाली सुचविलेल्या विशेष विषयांच्या व सांघिक कौशल्यांच्या यादी वरून विशेष विषय व सांघिक खेळ स्थानिक समस्येवर व परिस्थितीनुरूप चौथ्या आठवड्यांपासून २० व्या आठवड्यापर्यंत घेण्यात यावे.

## ■ सुचविलेल्या विशेष विषयांची यादी :

- किडनाशकांचे मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम.
- वाणांची व निरोगी बियाण्यांची निवड
- तण व्यवस्थापन
- माती आणि अन्नद्रव्ये व्यवस्थापन
- पाणी व्यवस्थापन
- मावा किडीचे व्यवस्थापन
- फूलकिडे व्यवस्थापन
- तूडतूडे किडीचे व्यवस्थापन
- अमेरिकन बोंड अळीचे व्यवस्थापन
- गुलाबी बोंडअळीचे व्यवस्थापन
- पांढरी माशी व्यवस्थापन
- कोळी या मित्र किडीचे व्यवस्थापन
- इतर परभक्षक किटकांचे व्यवस्थापन
- पिकावरील विविध रोग व्यवस्थापन
- फोरोमोन सापळे, प्रकाश सापळे, पक्षी मचाण या साहित्याचा वापर
- मुलस्थानी जलसंधारण
- सुक्ष्म सिंचन व्यवस्थापन
- सेंद्रीय खताचा वापर
- कंपोस्ट तयार करण्याची पद्धत
- बायोडायनॅमिक पद्धत
- हिरवळीच्या खतांचा वापर
- काढणीपश्चात तंत्रज्ञान
- एन.पी.व्ही/बी.टी.
- वनस्पतीजन्य किडनाशके
- ट्रायकोग्रामा शेतात सोडणे
- परोपजीवी किडींची ओळख

## ■ सांघिक कौशल्य व गट बांधणीचा अभ्यास :

**उद्देश :** सांघिक कौशल्याने गट बांधणीचा अभ्यास करून खालील बाबीविषयी सहभागी शेतकऱ्यांमध्ये परस्पर सामंजस्य निर्माण करणे.

## ■ सांघिक खेळांची यादी

१) जोड्या आणि साखळी

२) विविध प्राण्याचे आवाज काढणे

३) खेळातील लढाई

४) पाणी वाहण्याची स्पर्धा

५) संगीत खुर्ची

६) मनोरा बनविणे

७) याद्या बनविण्याची स्पर्धा

८) पेन न उचलता चित्र काढणे

९) मेणबत्या पेटविणे

१०) फुगे फोडणे

११) स्मरणशक्ती वाढविण्यासाठी स्पर्धा

१२) लहान मुलासारखे रडणे

१३) भावना प्रधान प्रसंग कथीत करणे

१४) जोडीदाराची निवड

१५) किडी आणि त्यांचे नैसर्गीक शत्रू यांची यादी करणे इत्यादी.

## ■ शेती शाळेमध्ये ठेवावयाचे रेकॉर्ड

### १) निवडण्यात आलेल्या शेतकऱ्यांची यादी

| अ.क्र. | शेतकऱ्याचे नांव | गाव | सर्व्हे नं. | लागवडीचा क्रम | पेरणीची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ ते २५ | | | | | |

### २) निवडण्यात आलेल्या शेतकऱ्यांची हजेरी बाबतचा अहवाल

| अ.क्र. | शेतकऱ्याचे नांव | गाव | प्रत्येक आठवड्याची उपस्थिती | | | | | | | एकूण उपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | | |
| | | | | | | | | | | | |

### ३) प्रात्यक्षिक क्षेत्रामध्ये घेतलेली रेसा निरिक्षणे

| अ. क्र. | शेतीशाळेच्या आठवड्याचा क्रमांक | शेतीशाळा घेतलेले ठिकाण | रेसा निरिक्षणाद्वारे शत्रु किटककांचे व मित्र किटकांचे प्रमाण | त्या आठवड्याचा अनुमान |
|---|---|---|---|---|
| | | | | |

४) पीक कापणी प्रयोगाचे उत्पन्ना बाबतची माहिती

प्रात्यक्षिक प्लॉट स्थानिक प्लॉट

| अ. क्र. | शेतकऱ्याचे नाव | प्रात्यक्षिकासाठी निवडलेलेक्षेत्र | लावणीची तारीख | कापणीची तारीख | आलेले उत्पन्न | गावांचे पूर्वीचे उत्पन्न | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

■ सांघिक एकात्मता (Group Dynamics)

**उद्देश :**१) शेतकऱ्यामध्ये सांघिक भावाना वाढीस लावणे.

२) शेतकऱ्यांमध्ये बौध्दिक स्पर्धा वाढविणे

३) शेतकऱ्यामध्ये समूह संघटन वाढविणे

४) शेतकऱ्यामधील सुप्त गुणांना वाव देणे.

५) नेतृत्व गुणांचा विकास करणे.

**कार्यपध्दती**

शेतीशाळेतील विविध कार्यक्रम जवळपास २-३ तास चालतात. या कार्यक्रमाच्या मध्यांतराच्या वेळी शेतकऱ्यांना सांघिक कार्यक्रमाचे माध्यमातून उत्साह वाढविण्याच्या हेतुने आयोजन केले जाते. या कार्यक्रमात सहभागी शेतकऱ्यांना मनोरंजनाच्या माध्यमातून विविध सांघिक खेळ, शाब्दिक कोडी, संस्थात्मक कोडी इ. सोडविण्यास दिली जातात. ही कोडी कधी वैयक्तिक तर कधी गटनिहाय दिली जातात.

प्रत्येक शेतीशाळेस सांघिक एकात्मता कार्यक्रमामध्ये चार्टवर विविध कोडी मांडली जातात. त्याची उत्तरे शेतकऱ्यांकडून चर्चेतून काढून घेतली जातात. यामध्ये प्रथम विजयी शेतकऱ्यांचे आय सी एम टाळी देऊन अभिनंदन केले जाते.

विविध प्रकारची कोडी सोडविण्यासाठी शेतकऱ्यांनी ज्या युक्त्या अथवा कौशल्ये वापरलेली असतात त्याच्या नोंदी चार्टवर घेऊन त्याची उत्पादन पध्दतीशी सांगड घातली जाते.

अशा प्रकारे सांघिक खेळाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो. त्यातूनच शेतकऱ्यांच्या शेतीशाळेतील सहभाग वाढण्यास मदत होते.

## ■ शेतीशाळेत घ्यावयाच्या विविध सांघिक कार्यक्रमाची माहिती

**१) खेळाचे नांव :** विविध प्राण्यांचे/ पक्षांचे आवाज काढणे.

**क ार्यपध्दती :** शेतीशाळेच्या सुरूवातीच्या काळात उपस्थित शेतकऱ्यांचे गट पाडणे आवश्यक असते. त्याकरिता ४ प्राण्याचे/पक्षांचे नावे असलेली चिठ्ठी शेतकऱ्यांना वाटली जाते त्यातील ४ शेतकऱ्यांना त्यांच्या चिठ्ठीतील पक्षी/ प्राण्यांचा आवाज काढावयास सांगितले जाते. आवाजाप्रमाणे चिठ्ठी पाहून गट केले जातात.

अशा रितीने झालेली गटनिर्मिती परिणामकारक ठरते.

**२) गांधीजी, सुभाषबाबु, नेहरू, आंबेडकर.**

**कार्यपध्दती :-** या खेळामध्ये शेतकरी गोलाकार उभे केले जातात. त्यांना वरील राष्ट्रीय नेत्यांची विशिष्ट पोज(ॲक्शन) करून दाखविली जाते. जसे गांधीजीच्या हातातील काठी, सुभाष बाबूंची सलामी, नेहरूंची हाताची घडी, आंबेडकरांचा उंचावलेला हात इत्यादी.

अशा प्रकारे शेतकऱ्यांना एकदा ॲक्शन घेऊन दाखविली जाते.

तद्नंतर एकाने फक्त राष्ट्रीय पुरूषाचे नांव घेऊन त्यांच्या प्रमाणे अभिनय करावयास सांगितले जातात. पुढे पुढे शेतकऱ्यांकडून विसंगत अभिनय येतो.

त्यामुळे या खेळातून शेतकऱ्यामध्ये एकाग्रता आवश्यक असल्याचे जाणवते हा निष्कर्ष निघतो.

३) **संदेश प्रसार :** या खेळामध्ये शेतकऱ्यांना एका फूटाचे अतंरावर ओळीत उभे केले जाते. यामध्ये पहिला शेतकऱ्याला कागदावरील ४-५ ओळीचा संदेश वाचावयास दिला जातो. तो संदेश जवळच्या व्यक्तिस चिठ्ठीत न पाहता सांगावयाचा असतो. अशा प्रकारे एका बाजुने संदेश पाठविला जातो. शेवटच्या माणसाला तो संदेश मोठ्याने सांगितला जातो. त्याचवेळी पहिल्या शेतकऱ्याला कागदावरील संदेश मोठ्याने वाचावयास सांगितला जातो.

यातून दोन वेगवेगळ्या संदेशातून निघणारे निष्कर्ष कानात आणि डोळयात चार बोटाचे अंतर असते. हा संदेश देतात.

**४) खेळाचे नाव :** एका आगकाडीने मेणबत्ती पेटविणे

या खेळामंध्ये शेतकऱ्याचे गटात १ काडी व अनेक मेणबत्या दिल्या जातात. यामध्ये जो गट जास्तीत जास्त मेणबत्या पेटवितो तो गट विजयी ठरतो.

या खेळातून उपलब्ध साधनाचा जास्तीत जास्त कसा उपयोग होतो व त्यासाठी कोणते कौशल्य वापरले पाहिजे याची जाणीव होते.

**५) खेळाचे नाव :** उलटा मासा

यामध्ये काड्यांच्या सहाय्याने एका बाजूस तोंड असलेला मासा अशी रचना असते. त्या काड्यांची अदलाबदल करून त्या माशीची दिशा बदलवली जाते.

या खेळामधून चाकोरीबध्द विचार न करता विशाल दृष्टीकोन ठेवून विचार करावा असा संदेश दिला जातो.

**६) खेळाचे नाव :** सुपर मार्केट

या खेळामध्ये शेतकऱ्यांना गटाप्रमाणे उभे केले जाते. दुसऱ्या बाजुने १०-१५ फुटावर एक व्यक्ति उभी राहते. ती व्यक्ति एखादी वस्तुची मोठ्याने नाव घेऊन मागणी करते.उदा. रूमाल ज्या गटातील व्यक्ति रूमाल प्रथम समोरच्या व्यक्तिस आणून देईल त्या गटास गुण दिले जातात. अशा प्रकारे जास्तीत जास्त गुण ज्या गटाचे होतात. त्यास विजयी घोषित केले जाते.

या मधून व्यक्तिमधील तत्परता समय सूचकता, उपलब्ध साधते. याबाबत आकलन होते

**७) पाणी वाहून नेण्याची स्पर्धा :** हा खेळ मैदानावर घेतला जातो. यामध्ये मध्यवर्ती ठिकाणी पाण्याने भरलेली बादली ठेवली जाते. तिच्या ४ बाजुस समान अंतरावर (१५ फुटावर) रिकाम्या बादल्या ठेवल्या जाता. ४ गटांना रिकाम्या बादलीपासून पाण्याने भरलेल्या बादली पर्यंत उभे केले जाते. त्यानंतर गटांना कुठल्याही साधनाचा वापर न करता रिकाम्या बादलीत पाणी वाहून नेण्यास सांगितले जाते.

या खेळातून उपलब्ध साधनाशिवाय एखादे काम कसे करावयाचे याचे कौशल्य वाढीस लागते. तसेच शेतकऱ्यामध्ये निकोप स्पर्धा होते.

८) **बादलीमध्ये चेंडू टाकणे :** प्रथमत: रिकाम्या जागी प्लास्टिकची बादली ठेवली जाते बादलीपासून १०-१५ फुट अंतरावर शेतीशाळेतील सहभागी प्रत्येक शेतकऱ्याच्या हाती प्लास्टिकचा बॉल (चेंडू) दिला जातो. त्यांनी तो चेंडूचा टप्पा जमिनीवर पाडून चेंडूची उडी बादलीमध्ये जाईल अशा रितीने टाकावयास सांगितले जाते.

या सांघिक खेळामध्ये ज्यांचे चेंडू बादलीत जातात ते शेतकरी विजयी घोषित करून त्यांचे खास आय.सी.एम. टाळी देऊन अभिनंदन केले जाते.

या नंतर बादलीमध्ये चेंडू घालविण्यासाठी कोणते कौशल्य आवश्यक आहे याबाबत चर्चा केली जाते. त्यावेळी त्यांचेकडून अचूक टप्पा साधने आवश्यक असल्याचे निष्कर्ष निघतात. त्या निष्कर्षाची सांगड शेतकऱ्याच्या उत्पादन पध्दतीशी घातली जाते.

९) **खेळाचे नाव :** जमिनीचे समान हिस्से करणे सोबतच्या आकाराप्रमाणे जमिनीचे चार समान सारखे भाग करावयास शेतकऱ्यांना सांगितले जाते. यामध्ये जे शेतकरी यशस्वी होतात त्यांचे अभिनंदन आय.सी.एम. टाली देऊन केले जाते.

यानंतर जमिनीचे समान भाग करण्यासाठी वापरलेल्या कौशल्याचा उपयोग शेतकऱ्याने उपलब्ध मनुष्यबळाचा सारख्या प्रमाणात उपयोग केल्यास उत्पन्नामध्ये वाढ होते. असा निष्कर्ष निघतो.

